"पर्यटन आधारीत निवडक व्यवसायांचे आर्थिक विश्लेषण: विशेष संदर्भ नांदेड जिल्हा "(२०११-२०१२ ते २०२०-२०२१)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा प्रस्तावित संशोधन आराखडा

संशोधक

कळसकर रुपाली धोंडिबाराव

एम.ए.(अर्थशास्त्र),डी.टी.एड.,बी.एड.

पारसनगर, पोस्ट शिवाजीनगर, नांदेड.

मार्गदर्शक

डॉ. पी.आर.मुट्ठे,

सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र यशवंत महाविद्यालय, नांदेड.

संशोधन केंद्र

पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड.

मार्च -२०२२

"पर्यटन आधारीत व्यवसायांचे सामाजिक-आर्थिक विश्लेषण:
विशेष संदर्भ नांदेड जिल्हा "

गोषवारा:

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत त्या पूर्ण करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीस आर्थिकरित्या सक्षम असणे गरजेचे असते. भारतासारख्या विकसनशील देशाची अर्थव्यवस्था ही मागासलेल्या स्वरुपाची असुन त्यात दारिद्र्य, बेरोजगारी, लोकसंख्या अशा समस्या उद्‌भवतात. तेव्हा वाढत्या लोकसंख्येस रोजगार पुरविल्यास त्यांच्या आर्थिक स्थितीत होणारे बदल प्रस्तुत संशोधन कार्यात अभ्यासावयाचे आहे. सामान्यांना रोजगार पुरविल्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधारणा होत असते. व त्यांच्या राहणीमानाचा दर्जाही हळू-हळू सुधारला जात असतो.

नांदेड जिल्ह्यातील पर्यटन स्थळावर स्वयंरोजगार करणाऱ्या व्यावसायीकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे अध्ययन सदरील संशोधनात करण्यात येणार आहे. या पर्यटन स्थळांवर राष्ट्रीय तसेच स्थानिक पातळीवरील पर्यटकांची सतत रेलचेल असल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील पर्यटन स्थळावर अनेक लोकांना स्वयंरोजगार प्राप्त झाल्याचे दिसुन येते. पर्यटनावर आधारीत अनेक प्रकारांपैकी नांदेड जिल्ह्यात मात्र ऐतिहासिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, शैक्षणिक पर्यटनास वाव मिळताना दिसते.

हे संशोधान करण्यासाठी माहिती संकलन करताना प्राथमिक साधन सामग्री, द्वितीयक साधन सामग्री वापरण्यात येणार आहे. या प्रस्तुत संशोधनात सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर केला आहे. आवश्यक त्या चाचण्यांचा अवलंब करुन तथ्याचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

१. प्रस्तावना :

भारतात "अतिथी देवो भव" माननारी संस्कृती आहे. गेल्या हजारो वर्षापासून पर्यटन हा भारतातील जीवनपद्धतीचा एक मूलभूत भाग बनून राहिला आहे. भारतातील पर्यटन व्यवसाय खूप वेगाने वाढू लागला आहे. विशेषतः अर्थव्यवस्था विकसीत होत असताना लोकसंख्येच्या मोठ्या वर्गाकडे पैसा खुळखुळू लागला आहे. त्याचबरोबर चांगले रस्ते, आधुनिक वाहतुक व्यवस्था आणि वाहन उद्योगांचा विस्तार यामुळे पर्यटनासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होऊ लागली आहे.

पर्यटन हा फक्त भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील सर्वात वेगाने वाढणारा उद्योग आहे. कंम्बोडीया, मॉरीशस, बाली, थायलंड इत्यादी देशांची संपूर्ण अर्थव्यवस्थाच पर्यटन उद्योगावर अवलंबून आहे. इ.स. २००० नंतर पर्यटन व्यवसायास वेग आला. भारतास ऐतिहासिक संस्कृतीचा वारसा लाभला आहे ही संस्कृती जोपासण्यासाठी अशा पर्यटन स्थळावर, धार्मिक स्थळांवर नागरिक भेट देत असतात. पूर्वी पर्यटन व्यवसायाचे स्वरुप खुप साधे म्हणजेच पर्यटन स्थळाच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या सुविधांचे व्यवस्थापन आणि नियोजन करणे इतकेच मर्यादीत होते. पण ह्याचे स्वरुप तंत्रज्ञान आणि सोशल मिडीया, तसेच पर्यटनाकडे सेवा व्यवसाय म्हणुन न पाहता पर्यटन उद्योग म्हणून पाहिले पाहिजे ह्या विचारांमुळे पर्यटन व्यवसाय व्यापक बनला आहे. पर्यटन स्थळावर लागणाऱ्या सोयी-सुविधा तसेच अनेक व्यवसाय आजुबाजुला असतात. कमीत-कमी गुंतवणूक आणि तुलनेने अधिक नफा हे पर्यटन उद्योगाचे रहस्य आहे. भारतात आर्किऑलॉजीवर आधारीत पर्यटन, कृषी पर्यटन, साहसी पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, सण-उत्सवावर आधारीत पर्यटन, साहित्यकला नृत्यसंगीत यांच्या महोत्सवातून पर्यटन, शिबिरे संस्कार वर्ग यातून पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, शैक्षणिक पर्यटन, विदेशातील पर्यटन असे विविध प्रकार आहेत.

भारतात पर्यटन हे क्षेत्र देशातील अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. आणि ते वेगानेही वाढत आहे. वर्ल्ड ट्रॅव्हल अँड टूरिझम कॉन्सिलने असे अनुमान काढले की, २०१८

मध्ये पर्यटनाने १६.९१ लाख कोटी रुपये व भारताच्या जी.डी.पी.च्या ९.२% उत्पन्न कमवले. पर्यटन व्यवसायामुळे ४२.६७३ दशलक्ष रोजगारांना पाठींबा दिला. हे रोजगार एकूण रोजगारातील ८.१% इतके आहे. पर्यटन क्षेत्रातील व्यवसायची वार्षिक वाढ ६.९% दराने होत असते असा अंदाज आहे.

महाराष्ट्रास भारतातील सांस्कृतिक वारस्याप्रमाणे, ऐतिहासिक, धार्मिक, भौगोलिक वारसा लाभला आहे. दरवर्षी विविध प्रांतातून ४ कोटी आणि परदेशातून २० लाख पर्यटक महाराष्ट्रात येतात. मुंबई, अंजिठा आणि वेरुळ यांना परकीय पर्यटकांची पहिली पसंती असते. महाराष्ट्र हे राज्य लोकसंख्या आणि क्षेत्रफळ या दोन्ही बाबतीत तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. विदेशी पर्यटक २०.८% व देशांतर्गत पर्यटक ७.२% असुन याबाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडी वरील राज्यांपैकी एक आहे.

नांदेड जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०,४२२ चौ.कि.मी. असुन भौगोलिक क्षेत्र १०,३३,१०० इतके आहे. यात एकूण गावांची संख्या १६०३ इतकी असुन एकूण लोकसंख्या ३३,५६,५६६ इतकी आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये साक्षरता (७६.९४), प्राथमिक शाळा (२२४२), प्राथमिक आरोग्य केंद्रे (६५), पशुवैद्यकीय केंद्रे, सिंचन व्यवस्था, (तलाव- १०९), लागवडी खालील क्षेत्र ७७,३८० इत्यादी. वरुन नांदेड जिल्हा सर्वतोपरी सक्षम होत असल्याचे स्पष्ट होते. अशा सर्व क्षेत्रातून नांदेड जिल्हा विकासाच्या दिशेने पाऊल टाकताना दिसतो.

नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्येचा विचार करता रोजगार प्राप्त होणे ही महत्त्वाची बाब असुन या दृष्टीने नांदेड जिल्ह्यातील पर्यटन व्यवसाय हा रोजगार निर्मितीबाबतीत एक महत्वाची भुमिका निभावत आहे. नांदेड येथील अनेक धार्मिक, ऐतिहासिक, शैक्षणिक पर्यटनाद्वारे राष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील पर्यटकांची सतत आवक जावक असते. त्यातुन सामान्यांना रोजगार संधी उपलब्ध होतात. त्यातून नांदेड जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक, प्रगती व सामाजिक आर्थिक स्थिती सुधारण्यात निश्चितच हातभार लागतो.

म्हणूनच पर्यटन स्थळांच्या ठिकाणी केल्या जाणाऱ्या व्यावसायांचा व त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगारांचा आणि व्यावसायीकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे महत्वाचे असल्याने प्रस्तुत संशोधनात सदरील अभ्यासावर भर दिला आहे.

२. पर्यटनाची पार्श्वभूमी व अर्थ :

पर्यटन ही संज्ञा प्रवास (Tour) या शब्दाशी संबंधीत आहे प्रवास (Tour) हा शब्द लॅटीन भाषेतील 'Tornos' या शब्दापासून आलेला असुन याचा अर्थ 'वर्तुळ' किंवा 'वर्तुळाकार' असा आहे. म्हणून हा वर्तुळाकार प्रवास अशाअर्थाने रुढ आहे.

"एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समुहाने एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय".

जागतिक पर्यटन संस्थेनुसार,

"मनोरंजन फुरसत किंवा कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय. जे लोक प्रवास करुन आपल्या परिसराबाहेरील जागी जाऊन सलग एक वर्षापेक्षा कमी काळ मनोरंजन, काम वा इतर कारणांसाठी राहतात त्यास पर्यटन म्हणतात."

२००० च्या शतकाच्या अखेरीस आलेल्या जागतिक मंदीने व H1 N1 फ्ल्युच्या साथीने २००८ ते २००९ मध्ये रोडावलेल्या पर्यटनाला २०१२ मध्ये बरे दिवस आले. २०१० च्या तुलनेत २०११ मध्ये ८.०३ लाख कोटी इतके पर्यटनावरचे उत्पन्न वाढले. हे २०१० च्या तुलनेत ३.८% अधिक होते.

३. नांदेड जिल्ह्यातील पर्यटन स्थळे :

महाराष्ट्राच्या इतिहासात मानाचं स्थान असणारा आणि प्राचीन वैभवशाली अशी ऐतिहासिक परंपरा लाभलेला ' नांदेड' जिल्हा सर्वपरिचीत आहे. नांदेड हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असून व्यापारी पेठ म्हणून प्रसिद्ध आहे. नांदेड हे महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागात असलेले जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. या शहराला व जिल्ह्याला ऐतिहासीक आणि धार्मिक वारसा आहे नांदेडला प्राचीन इतिहास लाभला आहे. गोदावरीच्या काठावर

वसलेले नांदेड शहर म्हणजे रामायण काळातील नंदीग्राम असल्याचे संगितले जाते. नंद साम्राज्याची गोदातीरावरची उपराजधानी नवनंदडेहरा म्हणजे नांदेड होय. नवदंडी, नंदीतट, नंदीग्राम, नंदीनगर, नंदीकड, नंद्याल, नंदीएड अशी नांदेडची पूर्वीची नावे आहेत.

सचखंड गुरूद्वारा नांदेड :

तख्त सचखंड श्री हुजूर अबचलनगर साहिब नांदेडचा हा मुख्य गुरू द्वारा आहे. भव्य पांढऱ्या संगमरवरीने रचलेल्या गुरूद्वारा मंदिराचा घुमट सोन्याने मढवलेला आहे. सचखंड गुरू द्वारा हे एक असे स्थान आहे जेथे गुरू गोविंदसिंगजी यांनी शेवटचा श्वास घेतला त्यामुळे हे स्थान धार्मिकदृष्टया पावन समजल्या जाते. गुरू गोविंदसिंगजी यांच्या सहवासाने नांदेड नगरी पावन झाली आहे. नांदेड येथील गुरू द्वाराची उभारणी पंजाबचे महान शासक महाराज रणजितसिंहजीं यांनी सन १८३० ते सन १८९१ दरम्यान केली असून त्यात शिखांच्या १० व्या गुरू ंचे मर्त्य अवशेष आहेत त्यामुळे नांदेड येथील गुरू द्वारा हे शिखबांधवांसाठी व हिंदू बांधवांसाठी पावन असे प्रार्थनास्थळ बनले आहे. गुरू गोविंदसिंगजी यांनी नांदेडला अबचलनगर व सचखंड असे संबोधले आहे. याचा अर्थ स्थिर शहर व सत्याचा प्रदेश असा होतो.

नांदेड येथील गुरूद्वारा परिसरात, खाद्य पदार्थ विक्रेते, कापड विक्रेते, शिंपी, सौंदर्य प्रसाधन विक्रेते, भांडे (कलश) विक्रेते, पंजाबी व अनेक प्रकारचे चप्पल विक्रेते, तलवारी, कुर्पान व कडे विक्रेते इ. अशा प्रकारचे व्यवसाय व तेथील व्यावसायिक यांच्या आर्थिक स्थितीचा आढावा प्रस्तूत संशोधनात घेण्यात येणार आहे.

श्री क्षेत्र काळेश्वर :

श्री क्षेत्र काळेश्वर हे नांदेड शहराला लागुन असलेले निवांत तिर्थक्षेत्र आहे. नांदेड-लातुर रस्त्यावर शहरापासुन ७ कि.मी. अंतरावर काळेश्वर हे गाव आहे. येथील मंदिर अत्यंत प्राचीन आहे. मंदिर उभारणी मध्ययुगातली असावी असे मानतात हे मंदिर यादवकालीन कलेचा नमुना आहे. मुळ मंदिर १३ व्या शतकातील असुन २० व्या शतकात त्याचा जिर्णोद्धार करण्यात

आला. महादेवाचे मनमोहक स्थान असलेले श्री क्षेत्र काळेश्वर गोदावरी नदीवर उभारलेल्या विष्णुपूरी उपसा सिंचन प्रकल्प यासाठीही प्रसिद्ध आहे. विष्णूपुरीतील ह्या उपसा सिंचन प्रकल्पास 'डॉ.शंकरराव चव्हाण जलाशय' म्हणून ओळखले जाते. सायंकाळच्या वेळी नौकाविहाराचा मनमुराद आनंद येथे लुटता येतो.

श्री क्षेत्र काळेश्वर ह्या धार्मिक पर्यटन स्थळावर, फुल विक्रेते, प्रसाद विक्रेते, खेळणी विक्रेते, खाद्य पदार्थ विक्रेते बोटिंग, टोकरा फेरी रसवंती गृहे इ. व्यवसाय आहेत. श्री क्षेत्र काळेश्वर येथील इ. व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांचा अभ्यास सदरील संशोधनात करण्यात येणार आहे.

कंधारचा किल्ला :

कंधार हे प्राचीन ऐतिहासिक शहर असुन तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. कंधारचे प्राचीन नाव 'खंदार' होते. चालुक्य व राष्ट्रकुट राजवट अतिशय वैभव व संपन्न होते. उत्खननामध्ये केशव राज्याची सुंदर अभंग मूर्ती तसेच वास्तू पुरुषाचे अवशेष सापडले आहेत. कंधारच्या किल्ल्यास भुईकोट किल्ला असे म्हणतात. २००० लोकसंख्या असलेल्या कंधार येथे राष्ट्रकुट राजा तिसरा कृष्ण याने या किल्ल्याचे बांधकाम केले हा किल्ला २४ एकरात असुन भोवती खंदक आहेत. किल्ल्यावर एक टेहाळणी बुरुज असुन अनेक तोफे आहेत. कधारचे पुर्वीचे नावं 'पंचालपूरी' असे असुन पांडवाचा द्रौपदी बरोबर येथे विवाह झाला होता अशी आख्यायिका आहे. कंधारचा किल्ला हा राष्ट्रीय पर्यटनाला वाव मिळवून देतो.

कंधार ह्या ऐतिहासिक पर्यटन स्थळावर खाद्यपदार्थ विक्रेते, खेळणी विक्रेते, महापुरुषांचे फोटो विक्रेते, पुस्तक विक्रेते, मूर्ती विक्रेते, टोपी विक्रेते अशा लहान व्यावसायिकांचा अभ्यास देखील या संशोधनात केला जाणार आहे.

कंधारचा दर्गाहः

मध्ययुगीन अवशेषांमध्ये सुफी संत हाजी सरवर महदुम सैय्या यांचा दर्गा मध्ययुगीन वास्तु परंपरा जोपासताना दिसुन येते. सन १३४८ च्या दरम्यान सैइदुद्दीन रफाई उर्फ हाजी सरवर

मकदुम सैय्या या नावाचे अवलीया कंधार आले व त्यांचा इंतकाल झाला. त्यांचा दर्गा हाजीसैया दर्गा म्हणून आज प्रसिद्ध आहे. हिंदू-मुस्लिम भाविकांचे आकर्षक ठरलेल्या या ठिकाणी ऊरुसही भरतो.

कंधारचा दर्गाह या नांदेड जिल्ह्यातील पर्यटन स्थळावर, फुल विक्रेते, शाल विक्रेते, प्रसाद विक्रेते, खेळणी विक्रेते आढळून येतात. उरूस असेल तेव्हा आकाशपाळणा व अशे गेम खेळविणारे फिरते व्यावसायीक, असे लहान व मोठ्यांनाही मनोरंजन व करमणूक करणारे व्यवसाय दिसून येतात. अशा व्यावसायिकांचा अभ्यास ह्या संशोधन कार्यात केला जाणार आहे.

माळेगाव यात्रा :

मल्हारी म्हाळसाकांताचे (खंडोबाचे) देवस्थान नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील माळेगाव येथे आहे. मराठवाड्याची ही सर्वात मोठी ग्रामदेवता आहे. खंडोबाचे येथे भव्य मंदिर असुन त्याचे बांधकाम १७ व्या शतकातील आहे. माळेगावची यात्रा दरवर्षी मार्गशीष (कृ.) महिन्यातील १४ व्या दिवशी भरवली जाते. दक्षिण भारतातील ही सर्वात मोठी यात्रा समजली जाते. यात्रे दरम्यान कलामहोत्सव, कुस्त्यांच्या दंगली यांचे आयोजन करण्यात येत असते. ही यात्रा उत्कृष्ट प्रतीच्या पशुधनाच्या व्यापाऱ्यांसाठी देशात प्रसिद्ध आहे येथील घोड्यांचा व्यापार विशेष प्रसिद्ध आहे. स्थानिक पातळीवर विविधतेत एकता याचे प्रमाण माळेगांवच्या यात्रेद्वारे दिसून येते.

नांदेड जिल्ह्यातील माळेगाव या पर्यटन स्थळावर खुप सारे व्यावसायिक, छोट्या-मोठ्या अशा दोन्ही स्वरुपाचा व्यवसाय करताना आढळून येतात. जसे खाद्यपदार्थ विक्रेते, कापड विक्रेते त्यात कपडे, पडदे, पायदान, घोंगडे इ. तसेच कलाकुसरीच्या वस्तू विक्रेते, कलानृत्य व्यवसाय, खेळणी विक्रेते, सौंदर्य प्रसाधने विक्रेते, हस्तोद्योग व्यवसाय, शिल्पकला व्यवसाय, पशुसाठी आवश्यक वस्तू विक्रेते व विशेष करुन पशू विक्रेते इ. माळेगाव यात्रेत व्यावसायिक व्यवसाय करताना दिसून येतात. तसे विविध मनोरंजाचे व करमणूकीचे व्यवसाय, लावणी

नृत्य, आकाशपाळणा व अशे गेम खेळविणारे फिरते व्यावसायीक, बंदुकीद्वारे निशाणा, तसेच कलेवर आधारित व्यवसाय, माळेगाव येथे व्यवसाय करताना दिसून येतात. पशू विक्रेत्यांसाठी ही यात्रा महत्त्वाची समजली जाते. अशा व्यावसायीकांचा आर्थिक स्थितीचा अभ्यास ह्या संशोधनकार्यात करण्यात येणार आहे.

श्री क्षेत्र माहूरगड :

नांदेड पासून १३० किमी. अंतरावर नागपूर शहरापासून चार तासांच्या अंतरावर असलेले एक गाव, जे श्री. दत्तात्रय, संताचे जन्मस्थान, देवी रेणूकाचे निवासस्थान व महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान श्री क्षेत्र माहुरगड होय. महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन पीठांपैकी माहूरचे श्री रेणूकादेवीचे स्थान पूर्ण पीठ मानले जाते.

समुद्रसपाटीपासून २६०० फूट उंचीवर असलेल्या दोन शिखरांच्या टोकावर श्री दत्तात्रय आणि रेणूकादेवीचे स्थान आहे. गडाच्या परिसरात माता अनुसया आणि परशुरामाचे मंदिर आहे. रेणूका देवीच्या मंदिरास ८०० वर्षे जुने मानले जाते. देवतेला सुपारीचा नैवेद्य हा पारंपारिक व अनोखा आहे. ऋषीमुनींची तपोभूमी म्हणूनही माहुरचे प्राचीन काळापासून महत्त्व आहे. मानसपुजा, भोजीपुजा, अलंकारपुजा झाल्यावर 'तांबुल प्रसाद' देवीला अर्पण केला जातो.

श्री क्षेत्र माहूरगड येथेही अनेक व्यावसायिक व्यवसय करताना दिसून येतात. जसे फुल विक्रेते, प्रसाद विक्रेते, प्रतिमा विक्रेते, मूर्ती विक्रेते, खाद्यपदार्थ विक्रेते, पुजा साहित्य विक्रेते, खेळणी विक्रेते, कापड विक्रेते इ.

आज घडीला ट्रॉली चालवणारे व्यावसायिकही श्री क्षेत्र माहूरगड येथे स्वंयरोजगार करताना दिसतात. प्रस्तूत संशोधन कार्य अशा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांचा अभ्यास करणार आहे.

माहुर किल्ला :

१२ व्या शतकात देवगिरीचे राजा रामदेव यांनी माहुरचा किल्ला जिंकुन घेतला होता. या किल्ल्यास 'राजगड' असेही म्हणतात. माहूर किल्ला हा गिरीदुर्ग किल्ला आहे. या किल्ल्याचा विकास बहामणी मोगलाच्या काळात झालेला असावा असे वाटते. किल्ल्यात हत्ती दरवाजा, बारुदखान, महाकाली बुरुज, धनबुरुज,(दलबुरुज) अशी अनेक बुरुजे आहेत.

माहूर किल्ला परिसरात खाद्यपदार्थ विक्रेते, प्रतिमा विक्रेते, पुतळे, मुर्ती विक्रेते इ. व असे व्यावसायिक व्यवसाय करतात. त्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास सदरील संशोधन करण्यात येईल.

माहुरची पांडव लेणी :

माहुरच्या जुन्या बसस्टँजवळ असलेल्या टेकडीच्या एका भागात लेणी कोरण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. तिथे भले मोठे सभागृह व गाभारा कोरण्यात आला आहे. तज्ञानुसार ही लेणी राष्ट्रकुट कालीन असावी. हे समग्र सभागृह १५ मीटर उंचीचे असुन त्यात असंख्य खांब नजरेत भरतात. गाभाऱ्यात भव्य शिवलींग प्रतिस्थापीत आहे.

सहस्त्रकुंड धबधबा :

हिमायतनगर तालुका ओलांडुन किनवट तालुक्यात प्रवेश केल्यावर इस्लामपूर पासुन अवघ्या ४ कि.मी. अंतरावर सहस्त्रकुंड धबधबा आहे. पैनगंगा नदीवरील हा आकर्षक धबधबा पर्यटकांसा विशेष आकर्षण आहे. प्राचीन आख्याइकेनुसार या ठिकाणास प्रभु परशुरामाचा पदस्पर्श झाल्याचे मानले जाते.२० मीटर उंचीवरुन कोसळणारा धबधबा " नांदेडचा नायगरा" म्हणून संबोधल्या जातो. पडत्या पावसात येथील अनोखे सृष्टी सौंदर्य वेगवेगळ्या ठिकाणावरुन अतिशय मनमोहक दिसते.

सहस्त्रकुंड धबधबा या नैसर्गिक पर्यटन स्थळी फोटोग्राफर, खाद्यपदार्थ विक्रेते, टोपी विक्रेते, कापड विक्रेते इ. अनेक व्यवसाय चालतात. हे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास प्रस्तूत संशोधनात करण्यात येणार आहे.

उनकेश्वर :

किनवट तालुक्यातील उनकेश्वर यालाच उनकदेव असेही म्हणतात. सागाच्या दाट वनातून उनकदेव येथे रामचंद्र यादवांच्या काळातला शिलालेख आहे. उनकेश्वर हे ठिकाण गरम पाण्याचे झरे यासाठी प्रसिद्ध आहे. पर्यटनाच्या अनेक प्रकारांपैकी महत्वपूर्ण असे वैद्यकीय पर्यटन उनकेश्वर येथून झळकते. वैद्यकीय पर्यटनाच्या अनुषंगाने उनकेश्वर अतिशय महत्वाचे पर्यटन स्थळ असल्याचे दिसून येते. येथे अशी मान्यता आहे की, आयुर्वेदिक दृष्टीकोनातुन या झऱ्यात स्नान केल्यास अनेक रोगांपासून मुक्तता होते.

होट्टल :

राष्ट्रकुंटाचा कलाविष्कार कंधारला जसा आहे तसा चालुक्य शिल्पशैलीचा वारसा देगलूर तालुक्यातील होट्टल येथे आढळतो. पोट्टलनगरी म्हणजे आधीचे होट्टल गाव. होट्टील येथील सिद्धेश्वर मंदिरात कलात्मक सभामंडप आहे. येथील नंदी मंडपात असलेल्या शिलालेखावरुन या मंदिराची रचना वन्ही कुळातील असल्याचे दिसुन येते. हा काळ विक्रमादित्यांचा होता. होट्टल परिसरात हजार -आठशे वर्षपुर्वीचे संस्कृत भाषेतले कन्नड व मराठी लिपीत कोरलेले शिलालेख आहेत.

नांदेड मधील चाळीस शिलालेखांपैकी होट्टल येथे चार शिलालेख पहावयास मिळतात. नृत्यगणेश, शिवाचे तांडव, शिल्प अप्सरा यासारखी प्रभावी रेखाटने पर्यटकांचे मन मोहून घेते.

होट्टल या ऐतिहासिक पर्यटन स्थळावर, खाद्यपदार्थ विक्रेते, मुर्ती, विक्रेते, इ. व्यावसायिक आहेत तसेच कला आधारित व्यवसाय, फोटोग्राफर लावणी, तबला, कथ्थक इ. अनेक व्यावसायिक होट्टल महोत्सवावेळी येतात.

४. अध्ययन विषयाची निवड / समस्यासूत्रण :

"नांदेड सारख्या निमशहरी भागामधील पर्यटनावर आधारीत व्यवसायाचा आर्थिक विकासातील सहभाग आणि त्यांच्या सामाजिक-आर्थिक परिणामांचा शोध घेणे."

५. संशोधनाची उद्दिष्टे:

१. नांदेड जिल्ह्यातील निवडक पर्यटन स्थळाच्या ठिकाणी असलेल्या निवडक व्यवसायांचा आढावा घेणे.

२. नांदेड जिल्ह्यातील पर्यटनामुळे व्यावसायीकांच्या आर्थिक स्थितीत होणाऱ्या बदलाचा अभ्यास करणे.

३. नांदेड जिल्ह्यातील पर्यटनावर आधारीत निवडक व्यवसायाच्या समस्यांचा अभ्यास करणे.

४. नांदेड जिल्ह्यातील पर्यटनावर आधारीत निवडक व्यवसायाच्या सामाजिक-आर्थिक परीणामांचा अभ्यास करणे.

५. नांदेड जिल्ह्यातील पर्यटनावर आधारीत निवडक व्यवसायाच्या समस्यांवर धोरणात्मक उपाय योजना सुचविणे.

६. संशोधनाची गृहितकृत्ये :

१. नांदेड जिल्ह्यातील पर्यटनावरील व्यवसायामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत.

२.नांदेड जिल्ह्यातील पर्यटनावर आधारीत स्वयंरोजगार करणाऱ्या व्यावसायीकांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे.

३.नांदेड जिल्ह्यातील पर्यटनावरील व्यवसाय जिल्ह्याच्या आर्थिक विकासात मदतीचा ठरत आहे.

७. संशोधनाचे महत्व :

भारतासोबत जगभरातही पर्यटन संस्कृती उदयास येऊन जोपासली जात आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, यशवंतराव चव्हाण यांनी पर्यटनाला चालना देण्यासाठी सन १९६२ साली पर्यटन 'संचालनालयाची' निर्मिती करण्यात आली. यातुन पुढे हॉटेल्स /रिसॉर्टस उभारणी, पर्यटनाशी निगडीत टुर पॅकेजेस चालवणे, कुशल मार्गदर्शक पुरवणे इ. अशा पर्यटन व्यवसायाच्या प्रक्रियेतुन अनेक रोजगार निर्मिती होते. पर्यटन स्थळी पारंपारीक व्यवसाय, फुल

विक्रेते, खाद्यपदार्थ विक्रेते, खेळणी विक्रेते, कापड विक्रेते, कलाकुसरीचे वस्तु विक्रेते हस्तोद्योगावरील वस्तु विक्रेते, कलागुण वाढीस लावणारे व्यवसाय सुरु असतात. व यातुन सामान्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतात. अशा व्यवसाय निर्मितीमुळे उत्पन्नाचा स्त्रोत सामान्य व्यक्तीस निर्माण होतो. त्यातुन त्यांच्या राहणीमानातही वाढ होते.

पर्यटन स्थळांवरील व्यावसायीकांच्या सामाजिक आर्थिक समस्या ओळखता येतात. तसेच पर्यटनाशी निगडीत सर्वच घटक पर्यटन वाढीच्या प्रक्रियेत सहभाग होतात का नाही हे तपासणे आवश्यक ठरते.

भारतासारख्या विकसनशील देशात रोजगार प्राप्त करुन देणाऱ्या क्षेत्रांपैकी पर्यटन स्थळावर व्यवसाय स्थापन करण्यास संधी निर्माण होते. लोकांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी त्यांनी कामे करणे गरजेचे असते. कुटूंबाच्या उदरनिर्वाहासाठी लागणारे उत्पन्नाचे मार्ग पुरवण्याचे पर्यटन स्थळावरील व्यवसाय हे एक स्त्रोत आहे.

प्रस्तुत संशोधनातुन पर्यटन स्थळावरील व्यवसायातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला जाणार आहे. नांदेड जिल्ह्यावरील पर्यटन स्थळावरील व्यवसाय एकूण जिल्ह्या आर्थिक स्थितीत कशाप्रकारे हातभार लावतो. हे अभ्यासण्यासाठी हे संशोधन कार्य महत्त्वाचे ठरते.

८. संशोधन पद्धती :

पर्यटन आधारीत व्यवसायांचे सामाजिक-आर्थिक विश्लेषण प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे. सदरील संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे. प्रस्तुत अध्ययन विषय संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही प्रकारात मोडतो. या संशोधनाकरीता तथ्य संकलनाच्या प्राथमिक आणि दुय्यम साधन सामग्री या दोन्ही पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्यातुन मिळालेल्या माहितीच्या आधारे संशोधन कार्य पूर्ण करण्यात येणार आहे.

८.१ तथ्य संकलन :

संशोधनाच्या दृष्टीने माहिती संकलीत करणे अत्यंत आवश्यक असते. सदरील संशोधनासाठी गोळा करण्यात येणारी माहिती प्राथमिक साधन सामग्री व दुय्यम साधन सामग्रीच्या आधारे प्राप्त केली जाणार आहे.

८.१.१. प्राथमिक साधन सामग्री :

प्राथमिक माहिती स्त्रोतांमध्ये निरीक्षण, मुलाखत आणि प्रश्नावली ही प्रमुख साधने वापरली आहेत. संशोधक स्वयंरोजगार करणाऱ्या व्यावसायीकांसाठी प्रश्नावली तयार करुन माहिती मिळविली आहे. या प्रश्नावलीच्या सहाय्याने प्रत्यक्ष भेटी देऊन प्राथमिक माहिती संकलीत करण्यात येणार आहे.

८.१.२ दुय्यम साधन सामग्रीः

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी अध्ययन विषयाच्या अनुषंगाने विविध पुस्तिका, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, विविध प्रकाशित लेख, दैनंदिन वर्तमान पत्रे, सरकारी व गैरसरकारी वार्षिक अहवाल, विविध संकेत स्थळे, जिल्हा आर्थिक समालोचन अहवाल, तहसिल आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याद्वारे प्रकाशित अहवाल, विविध संशोधन अहवाल, पर्यटन विषयक मूळ ग्रंथ इत्यादी दस्ताऐवजांचा गरजेनुसार वापर करण्यात येणार आहे.

८.१.३ नमुना निवड पद्धती

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने संशोधनासाठी नमुना निवड करण्यासाठी गैर-संभाव्यता नमुना निवड पद्धती वापरण्यात आली आहे. सदरील संशोधनात हेतुपुरस्सररित्या पर्यटन स्थळांची निवड करण्यात येणार आहे.

सहेतुक नमुना निवड पद्धती

सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करुन नांदेड जिल्ह्यातील १७ पर्यटन स्थळापैकी जाणिवपूर्वक ८ पर्यटन स्थळे नमुना म्हणुन निवडण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक पर्यटन

स्थळावरील विभिन्न ५० व्यावसायींकाची प्रश्नावली भरुन घेतली जाणार आहे. व असे पूर्ण मिळून ८ पर्यटन स्थळावरुन ४०० व्यावसायीकांची प्रश्नावली भरुन घेतली जाणार आहे.

८.२ तथ्य विश्लेषण:

तथ्य संकलनाच्या प्राथमिक आणि दुय्यम साधन सामग्री अशा दोन्ही पद्धतीच्या आधारे माहिती संकलीत करुन त्या सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी अनेक सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. त्यामध्ये विविध आलेख, तक्तेकरण, सारणीकरण, सरासरी, मध्य अशा विविध सांख्यकीय तंत्राचा अवलंब करण्यात येणार आहे. सदरील तथ्यांची तपासणी करण्यासाठी t-test, X^2 test, Z test अशा अनेक चाचण्यांचा वापर केला जातो. प्रस्तुत संशोधनात गरजेनुसार योग्य त्या चाचणीचा वापर करण्यात येणार आहे.

८.३ संशोधन कालावधी :

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी सन २०११-१२ ते २०२०-२१ अशा एकूण १० वर्षाचा सलग कालावधी घेण्यात आला आहे.

८.४ संशोधन मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान स्थितीवर आधारीत असुन २०११ -१२ ते २०२१-२२ या कालखंडा संदर्भात यात अध्ययन केले जाणार आहे. इतर कालावधीसाठी संशोधनधाचे निष्कर्ष लागू होतीलच असे नाही.

प्रस्तुत संशोधनामध्ये नांदेड जिल्ह्यातील पर्यटन स्थळावरतीच अधिक लक्ष केंद्रित केले जाणार आहे. प्रस्तुत संशोधन अध्ययनात पर्यटन संबंधीत निवडक व्यवसाय व व्यवसायीकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीच्या विश्लेषणावर अधिक भर दिला जाणार आहे. संशोधनात प्राथमिक सामग्रीचा वापर करण्यात आल्यामुळे प्रश्नावली, मुलाखती घेताना उत्तरदात्यांकडुन सांगण्यात येणारी माहिती, पूर्वग्रहदुषित असण्याची मर्यादा पडते.

९. प्रकरणांची रुपरेषा :

प्रकरणे - पहिले : प्रस्तावना

या प्रकरणामध्ये पर्यटनावर आधारीत व्यावसायीकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी भारताचे पर्यटन व्यवसायातील योगदान, महाराष्ट्राचे पर्यटन व्यवसायातील योगदान, पर्यटनाची पार्श्वभूमी व अर्थ, नांदेड जिल्ह्यातील पर्यटन स्थळे व तेथील व्यवसाय स्पष्ट केले जाईल.

वरील अध्ययन विषयाची निवड, महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितकृत्ये, संशोधनाची मर्यादा, संशोधन पद्धती, तथ्य संकलन, तथ्य विश्लेषण, संशोधनाचा कालावधी, नमुना निवड पद्धती इत्यादी घटकांचे विश्लेषण केले जाईल.

प्रकरणे - दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत संशोधनात संशोधन साहित्याचा आढावा या प्रकरणात संशोधन साहित्याचा आढावा घेताना अध्ययन विषयाशी संबंधीत आंतरराष्ट्रीय पातळीवरील, राष्ट्रीय पातळीवरील, स्थानिक पातळीवरील संशोधन साहित्याचाही संक्षिप्त आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरणे - तिसरे : नांदेड जिल्ह्याची ओळख / दृष्टिक्षेप

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्ह्याची ओळख, भौगोलिक स्थान, दिशा, जिल्ह्याचा नकाशा, जिल्ह्याचा समग्र भौगोलिक आढावा, स्पष्ट करण्यात येईल.

सदरील संशोधन कार्य नांदेड जिल्ह्यावर अधिक प्रकाश टाकत असल्यामुळे, नांदेड जिल्ह्याची इत्यंभूत माहिती व्हावी या अनुषंगाने या प्रकरणात नांदेड जिल्ह्याची सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, कृषीविषयक, आर्थिक या आयामांची संक्षिप्त सांख्यिकीय माहिती दिली जाणार आहे.

प्रकरणे - चौथे : नांदेड जिल्ह्यातील पर्यटनावर आधारीत व्यवसायाचे सामाजिक-आर्थिक विश्लेषण

प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने या प्रकरणांतर्गत नांदेड जिल्ह्यातील निवडक पर्यटन स्थळांच्या ठिकाणी असणारे व्यवसाय व तेथील व्यवसायीकांचे अध्ययन करुन त्यांची सामाजिक-आर्थिक माहिती संकलीत करण्यात येणार आहे. व संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरणे - पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील पर्यटनावर आधारीत व्यवसाय विषयीच्या संदर्भात तथ्य संकलनातुन मिळालेल्या माहितीच्या आधारावर निष्कर्षाची मांडणी गृहीतकृत्यांची पडताळणी व संशोधनातुन काही महत्वपूर्ण शिफारशी सांगण्यात आल्या आहेत.

वर्षनिहाय नियोजनाची रुपरेषा :

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी व अध्ययना बरोबर प्रबंध लेखनाचे कार्य यासाठी विषयनिहाय नियोजीत आराखडा खालीलप्रमाणे राहील.

प्रथम वर्ष :

प्रथम वर्षात संशोधनाच्या विषयानुषंगाने अध्ययन सामग्रीचे संकलन, उद्दिष्टे मर्यादा ह्याप्रमाणे प्रथम प्रकरणाची रुपरेषा व मांडणी करणे, संशोधन साहित्याचा आढावा घेणे व गोळा केलेल्या तथ्यांचे अध्ययन करुन विश्लेषण करणे. इत्यादी कार्य करण्यात येणार आहेत.

द्वितीय वर्ष:

संकलीत करण्यात आलेल्या तथ्यांच्या विश्लेषणातुन गृहीतकृत्यांची पडताळणी याद्वारे निष्कर्ष प्रस्तुत करणे. अध्ययन विषयासंदर्भात विविध शिफारशी मांडण्यात येणार आहे. व संपूर्ण प्रकरणाच्या समावेशाचा प्रबंध अहवाल विद्यापीठात सादर करण्यात येणार आहे.

संदर्भ सूची :

१. बोधनकर सुधीर, अलोनी विवेक(१९९९) सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक ललीता पुराणे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. आगलावे प्रदीप,(२०००) संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर.

३. खैरनार दिलीप (२००४) सामाजिक संशोधन पद्धती, चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद.

४. शिंदे एस.बी. ,पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. सौताडेकर विवेक , आपला नांदेड जिल्हा, नांदेड जिल्हा विशेषांक, विद्याभारती प्रकाशन.

६. घाटी अमरदीप, अक्कलवाड एन.के.,नांदेड जिल्हा, सुधारीत आवृत्ती, वर्षा पब्लिकेशन, नांदेड.

७. अन्नदते शशिकांत व अन्नदाते स्वाती, संशोधन पद्धती, नेट-सेट-पेट मार्गदर्शक, के.सागर प्रकाशन, पुणे.

८. कोळंबे रंजन, भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे.

९. गाल्टुंग जॉहेन, थिअरी अँण्ड मेथडस ऑफ सोशल रिसर्च जॉन ॲलन ॲण्ड आन्विद लि. न्युऑर्क.

१०. नाडगोंडे गुरू नाथ, सामाजिक संशोधन पद्धती,(२००१) फडके, प्रकाशन कोल्हापूर,

११. काचोळे दा.धों. सामाजिक संशोधन पद्धती,(१९९९) कैलास प्रकाशन, औरंगाबाद.

१२. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,(२०१८), नांदेड जिल्हा.

१३. डॉ.घाटोळ रा.ना.,(१९९२) समाजशास्त्रीय संशोधन, मंगेश प्रकाशन,नागपूर.

१४. विनोद अग्रवाल, भारतीय पर्यटन,(२०१५) अर्जुन पब्लिकेशन हाऊस, दिल्ली.

१५.भव्या कुमार, सहानी, (२०२१) पर्यटन विकास, उत्पाद संचालन और स्थिती अध्ययन, श्री.चक्रधर पब्लिकेशन, दिल्ली.

१४. www.Shodha.inflibnet.ac.in.

१५. mr.m.wikipedia.org./wiki/Bharat paryatan.

१६.www.indiatourism.net.

१७.www.incredibleindia.org.

१८. www.maharashtratourism.govg.in.

१९. mr.vikaspedia.in

२०.https://udyojak.org

२१. https://nanded.gov.in.

संशोधक

प्रा. कळसकर रुपाली धोंडीबाराव
सहाय्यक प्राध्यापक
एम.ए. (अर्थ.),बी.एड.,डि.टी.एड.
पारसनगर,पोस्ट शिवाजीनगर, नांदेड.

मार्गदर्शक

डॉ. पी.आर.मुट्टे ,
सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख,
पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र,
यशवंत महाविद्यालय, नांदेड.